महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

सहकार पणन व वस्त्रोद्योग

उपनिबंधक,सहकारी संस्था, नगर तालुका, अहमदनगर यांचे कार्यालय,

महात्मा फुले चौक, कमर्शियल बिल्डींग, पहिला मजला,अहमदनगर-४१४००१

2257 दुरध्वनी क्र.०२१४-२३५३८५९ ई-मेलः drnagartaluka@gmail.com

जा.क्र उनिन वि-१/व्हीआरडीई/कलम८८/चौ.अ.आदेश/सन-१७ दिनांक:24/७/१७

ते 2300

वाचावे:-१. श्री एम ई वारे अपर लेखापरीक्षक,सहकारी संस्था, नगर तालुका,अहमदनगर यांचे कडील दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ या कालावधीचा फेर लेखापरीक्षण अहवाल दिनांक ०२/०६/२०१७ या कार्यालयास प्राप्त दि.१७/०६/२०१७

२. श्री एम ई वारे अपर लेखापरीक्षक,सहकारी संस्था, नगर तालुका,अहमदनगर यांचेकडील दिनांक २०/०६/२०१७ चा दिनांक २१/०६/२०१७ रोजी प्राप्त फेर लेखापरीक्षण अहवालाचा विशेष अहवाल.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व त्याखालील नियम ७२ मधील तरतूद.

## -प्रस्तावना-

ज्याअर्थी, व्ही आर डी ई सिव्हीलियन एम्प्लॉ.को-ऑप क्रेडीट सोसा.लि.अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था असून या संस्थेचा नोंदणी क्र.एएनआर/एएनआर/बी टी के(ओ)/(सी आर)/९१ दिनांक ०३/०४/१९९१ असा असुन ही संस्था या कार्यालयाच्या वैधानिक कार्यकक्षेत येते;

ज्याअर्थी सदर संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व संस्थेच्या उपविधीतील तरतूदीनुसार करणे संस्थेवर बंधनकारक आहे;

ज्याअर्थी, वाचले क्र. १ अन्वये श्री एम ई वारे अपर लेखापरीक्षक,श्रेणी-२, सहकारी संस्था, नगर तालुका,अहमदनगर यांनी दिनांक ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१५ या कालावधीचा फेरलेखापरीक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला असून तसेच वाचले क्र.२ अन्वये त्यावरील प्रशासकीय विशेष अहवाल सुध्दा या कार्यालयास सादर केलेला आहे;

ज्याअर्थी, वाचले क्र.१ व २ अन्वये प्राप्त अहवालांचे अवलोकन करता, संस्थेच्या दिनांक ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१५ या कालावधीत अहवालमध्ये नमूद केलेप्रमाणे संस्थेत विविध स्वरुपात प्रत्यक्ष अपहार व आर्थिक गैरव्यवहार झालेचे नमूद केलेले आहे; त्यामुळे सदर संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले आहे, असे स्पष्ट निदर्शनास आलेले आहे;

त्याअर्थी, सदर संस्थेच्या नमूद कालावधीच्या संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी (संचालक ) व अधिकारी/कर्मचारी त्यांच्याकडून झालेल्या अपकार्य/संस्थेच्या निधीचा गैरवापर/विश्वासघात/पैसा ठेवून घेतल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीस कोण व किती रकमेस जबाबदार आहे याची नुकसानी आकारण्याची बाब निश्चित करणेची खात्री होत असलेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मी, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

मी, राम कुलकर्णी उपनिबंधक, सहकारी संस्था,नगर तालुका, अहमदनगर; मला प्राप्त अधिकारानुसार व्ही आर डी ई सिव्हीलियन एम्प्लॉ.को-ऑप क्रेडीट सोसा.लि.अहमदनगर या संस्थेच्या वाचावे क्र. १ व २ मधील सादर केलेल्या फेरलेखापरीक्षण अहवाल व विशेष लेखापरीक्षणास अनुसरुन आढळुन आलेल्या गंभीर मुद्यांबाबत सदर संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणा-या

व्यक्तींकडून आर्थिक नुकसानीच्या रकमा वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व त्याखालील नियम ७२ मधील तरतुदीनुसार सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केलेल्या मुद्यांबाबत चौकशी करण्याचे आदेश देत आहे.

सदर चौकशी कामी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. सुर्यवंशी सुखदेव दिनकर ,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, तालुका पारनेर, यांची नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील नियमास अधीन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मधील मुद्यांबाबत चौकशी करुन संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस कोण किती जबाबदार आहे व किती रकमेस जबाबदार आहे हे निश्चित करुन त्या रकमा वसुली संबंधी तसेच चौकशी कामी होणारा खर्चाबाबतही आवश्यक ते आदेश दयावेत.

सदर प्राधिकृत अधिकारी यांना रुपये १५,०००/- (पंधरा हजार रुपये मात्र) चौकशी मेहनताना मंजूर करण्यात येत आहे. या रकमेमध्ये चौकशी फी आणि चौकशीकामी प्राधिकृत अधिका-यांना करावयास लागणा-या सर्व खर्चाचा समावेश आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी चौकशी अहवाल मार्च २०१८ च्या आत या कार्यालयास तीन प्रतीत सादर करावा.

(सदरचा आदेश आज दिनांक २५/०७/२०१७ रोजी माझे सही शिक्यानिशी व कार्यालयीन मोहरनिशी दिला असे)

25/7/2017

अहमदनगर
दिनांक :२५/०७/२०१७

(आर बी कुलकर्णी)
उपनिबंधक,सहकारी संस्था
नगर तालुका, अहमदनगर

प्रत-

१. श्री सुर्यवंशी सुखदेव दिनकर ,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, तालुका पारनेर, जि.अहमदनगर
२. चेअरमन/सेक्रटरी-
व्ही आर डी ई सिव्हीलियन एम्प्लॉ.को-ऑप क्रेडीट सोसा.लि. वाहननगर, अहमदनगर
२/- यांना कळविणेत येते की, सदर चौकशीकामी आवश्यक ती कागदपत्रे व संपूर्ण दफ्तर प्राधिकृत अधिकरी यांना उपलब्ध करुन दयावे. तसेच चौकशी फी रुपये १५,०००/- (पंधरा हजार फक्त) या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांत जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, अहमदनगर यांचे अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अहमदनगर शाखा- स्टेशन रोड,अहमदनगर येथील बचत खाते क्र.१६/२६ मध्ये भरणा करुन चलनाची प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, अहमदनगर
मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, अहमदनगर

25/7/2017

उपनिबंधक,सहकारी संस्था
नगर तालुका, अहमदनगर

# उपनिबंधक,सहकारी संस्था,नगर तालुका यांचेकडील आदेश दिनांक २५/०७/२०१७ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट-अ

१. बोगस कर्ज वाटपातुन केलेल्या रकमेचा अपहार रुपये १,६३,४१,२१९/-
२. मुदत ठेव ठेवलेली नसतांना मुदत ठेव /व्याज नावे नोंदवून केलेला अपहार रुपये ४०,८६२/-
३. शैक्षणीक कर्ज नांवे नोंदवून केलेला अपहार रुपये २,००,०००/-
४. मुदत ठेव पावतीची रक्कम किर्दीस जमा न करता सभासदांना ठेव पावती देवून केलेला अपहार रुपये ७६,०५८/-
५. कीर्दीस रक्कम जमा नसतांना कर्ज खाती जमा घेवून केलेला अपहार रुपये ५०,०००/-
६. नफा वाटणी व्यवहार नोंदवीतांना केलेला अपहार १,५१,२६७/-
७. बँक कॅश क्रेडीट खाती रक्कम जमा नसतांना कीर्दीस नांवे नोंदवून केलेला अपहार रुपये ३,४७,७४०/-
८. कर्जदार सभासदांच्या वेतनातून कपात करुन कर्जापोटी मासीक हप्ता व त्यावरील व्याज वसुल करुन संस्थेस चेक व्दारे जमा केलेले असून संस्थेने सभासदांचे कर्ज खाती रक्कम जमा करते वेळी व्याजा पोटी वसुल झालेली रक्कम कर्ज खाती जमा घेवून सदर रकमेचा अपहार करणेच्या उद्देशाने व केलेला अपहार लपविण्यासाठी रोजकीर्दीस केलेल्या आहेत, रुपये १३,१२,५९४/-
९. कीर्दीस बोगस रक्कम नावे नोंदवून केलेला अपहार रुपये ३९,४५२/-(व्याजाचे नुकसान)
१०. कीर्दीस जमा असलेल्या रकमेचे चेक मात्र संस्थेच्या बॅक कॅश क्रेडीट जमा न झालेल्या रकमा रुपये १,००,०००/-
११. फेर लेखापरीक्षणा मधील भाग क मधील तपशीला प्रमाणे सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीतील निदर्शनास आलेले दोष व गैरव्यवहाराचे आक्षेप त्यामुळे झालेले संस्थेचे नुकसान.

25/7/2017

(आर बी कुलकर्णी)
उपनिबंधक,सहकारी संस्था
नगर तालुका, अहमदनगर